# ई - पोलीस पत्रिका

दि १६/०२/२०२४ अनु.क्र.३३

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

## बदली

**०१.पोआअ/आस्था-१/मुदत पुर्व बदली/१११०/२०२४अमरावती शहर दिनांक ३१/०१/२०२४**

### आदेश

**संदर्भ** :-१) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/१४/२०१४ /७३ दिनांक २५/०२/२०१५

२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५

३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२ दि.२७.५.२०२२

### आदेश

उपरोक्त संदर्भात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधील कलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद **पोलीस अंमलदार** यांची विनंतीवरून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे सांगोपांग विचार करुन **मुदतपुर्व बदली (पदस्थापना)** करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब. क्रं. | पोलीस अंमलदाराचे नाव | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|---|
| १. | चापोहवा | ११३० | दिनेश तवले | मोटार परिवहन विभाग | पो.स्टे.गाडगेनगर |

**०२.पोआअ/पशा-१/पोउपआ/माने/कार्यमुक्त/१३१६/२०२४अमरावती शहर दिनांक ०६/०२/२०२४**

### आदेश

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचे आदेश क्र. रोपोसे- १७२४ / प्र.क्र. १६/ पोल- १अ. दिनांक ०५ फेब्रुवारी २०२४ अन्वये राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे.

| अ.क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नांव | विद्यमान पदस्थापना | बदलीने पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ | श्रीमती वैशाली उत्तमराव माने | पोलीस उप आयुक्त, अमरावती शहर | पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे |

त्या अनुषंगाने श्रीमती वैशाली उत्तमराव माने, पोलीस उप आयुक्त, अमरावती शहर हया दि ११.०९.२०२१ पासून रुग्णनिवदेनावर असल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरीता या आस्थापनेवरुन दिनांक ०६/०२/२०२४ चे म. नंतर स्थित कार्यमुक्त (Stand relieve) करण्यात येत आहे.

**०३.पोआअ/पशा-१/पो.नि.नेमणुक/१३९४/२०२४अमरावती शहर दिनांक ०८/०२/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक :पोमसं/३/१०/६/विनंती बदली - पोलीस निरीक्षक /१०/२०२४, दिनांक ०५/०२/२०२४ अन्वये नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांची विनंतीवरुन त्यांच्या नावासमोर नमुद ठिकाणी बदली करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने खालीलनमुद पोलीसनिरीक्षकहे अमरावती शहर घटकांत त्यांचे नावासमोर नमुद दिनांकास बदलीवर हजर झाले आहेत. त्यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पुढील आदेशापर्यंत तात्पुरती नेमणुक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीस निरीक्षक यांचे नाव | पूर्वीचे नेमणुकीचे ठिकाण व कार्यमुक्त दिनांक | अमरावती शहर येथे बदलीवर हजर झाल्याचा दिनांक व नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २२ | श्री अनिरुध्द रमेश पुरी | नागपुर शहर (गडचिरोली बदली आदेशाधीन) येथून दि. ०२.०२.२०२४ चे मा. नंतर रोजी कार्यमुक्त | अमरावती शहर येथे दि.०६.०२.२०२४ रोजी म.पूर्व हजर **नेमणुक - विशेष शाखा (प्रभारी)** |

उपरोक्त नमुद पोलीसनिरीक्षक यांनी त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी तात्काळ हजर होऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

## प्रशिक्षण

**०१.पोआअ/पशा-१/MIA/AVSEC/४८७/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/०२/२०२४**

**संदर्भ :-** विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे यांचे बिनतारी संदेश O.NOMIA/TRG/FEB/AvSec Induction Course No. ०१/२४/५०८ दि. ०५.०२.२०२४

**विषय :-**Aviation Security Inducton Course No. ०१/२०२४ या प्रशिक्षणासाठीपोलीस अधिकारी पाठविणे बाबत.

**आदेश**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे **Aviation Security Inducton Course** या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद अधिकारी यांची सदरचे प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षण केंद्राचे नाव | प्रशिक्षण दिनांक | अधिका-याचे नांवे | नेमणुक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | २०.०२.२०२४ ते २४.०२.२०२४ | श्री. गजानन लोकडे पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. नांदगांव पेठ, अमरावती शहर |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण शुल्क प्रत्येकी रु. ७५००/- आकारण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षण निधी मधुन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी UNIFORM, I-CARD, SPORTS DRESS, SPORT SHOES, RELIEVING MEMOइत्यादी साहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

२. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही व त्यांना परत करण्यात येईल. तसेचप्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

३. उपरोक्त प्रशिक्षणार्थीनी वैद्यकीय आपतकालीन परिस्थितीकरीता महाराष्ट्र कुटूंब कल्याण आरोग्य योजना कार्ड सोबत नेणे आवश्यक आहे.

**०२.पोआअ/आस्था-४/Installation Security-०४/१८१३/२०२४ अमरावती शहर दिनांक १५/०२/२०२४**

**संदर्भ** :- मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तावार्ता प्रबोधिनी,पुणे यांचे बिनतारी संदेश जा.क्र MIA/TRG/FEB/InstallationSecurity COURSE०३/२४/PUNE/ ५०७,दि.५/२/२०२४

**विषय** :- महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे आयोजीतInstallation Security Course प्रशिक्षणकरीता पोलीस अंमलदार पाठविणे बाबत.

*****

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन, Installation Security Course - ०४/२०२४संदर्भातील प्रशिक्षण महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०१ कॅम्पस, रामटेकडी, पुणे येथेदिनांक २०/०२/२०२४ ते २३/०२/२०२४या कालावधीत आयोजित करण्यात येणार असुन त्याकरीता या कार्यालयाच्या आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव,पदनाम व बक्कल क्रमांक | नेमणुक |
|---|---|---|
| ०१ | पोशि/३३२ दत्तात्रय कारभारी मुंडे | आर.सी.पी. पो.मु.,अमरावती शहर |
| ०२ | पोशि/३३३ संतोष चुनलाल मुंडे **(राखीव)** | पो.स्टे.कोतवाली |

वरील प्रमाणे निवड करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांनी सदर प्रशिक्षणाकरीता दिनांक १९/०२/२०२४ रोजी २०:०० वाजेपावेतो हजर होतील अशा बेताने ओळखपत्र, कुटूंब आरोग्य योजनेचे कार्ड, रिलीव्ह मेमो व आवश्यक त्या किटसह रवाना करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,अमरावती शहर यांनी प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षणाकरीता नमुद दिनांकास न चुकता रवानगी द्यावी तसेच प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेले जे पोलीस अंमलदार प्रशिक्षणास गैरहजर राहल्यास किंवा प्रशिक्षण केंद्रात वेळेच्या आत हजर न झाल्यास त्यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

### रजा

**०१.पोआअ/आस्था- ५/सिक कालावधी/१४५७/२०२४अमरावती शहर दिनांक ०९/०२/२०२४**

## सुधारित आदेश

मपोशि/१९०६ वैशाली राउत नेमणुक पो. स्टे. वलगाव यांचा ११४ दिवस रुग्णनिवेदन कालावधी या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-५/सिक कालावधी/३२०/२०२२, दिनांक १२/०१/२०२३ अन्वये (**स्तंभ-अ** प्रमाणे) परिवर्तीत रजा मंजुर करण्यात आली आहे.तथापि त्यांचे रजेच्या खाती पुरेशी अर्धवेतनी रजा शिल्लक नसल्याने त्यांचा ११४ दिवस रुग्णनिवेदन कालावधी **स्तंभ- ब** प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्तंभ-अ | स्तंभ - ब | प्राधिकार |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १५/०२/२०२२ ते दिनांक ०८/०६/२०२२ पर्यत **११४** दिवस रुग्णनिवेदन कालावधी परिवर्तीत रजा | दि.१५/०२/२०२२ ते दि.१०/०४/२०२२ पर्यत ५५ दिवस **परिवर्तीत रजा** मंजुर<br>दि.११/०४/२०२२ ते दि.०८/०६/२०२२ पर्यत ५९ दिवस **अर्जित रजा** मंजुर | **नियम ६१ नुसार**<br>**नियम ५० नुसार** |

तसेच वर नमुद पोलीस महिला अंमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहिती देऊन आपल्या येथील सिक रजिस्टर मध्ये तशी नोंद करण्यात यावी.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/कसुरी/गार्ड/अंतिम आदेश/सपोउपनि-१७५४+२/१४७९/२०२४अमरावती शहर**
**दिनांक १२/०२/२०२४**

**संदर्भ** :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १७४१/२०२३, दिनांक २९/०८/२०२३
२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/गार्ड/का.दा.नो/ सपोउपनि-१७५४ पवार + २/११८८८/२०२३ अमरावती शहर, दिनांक २७/१०/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** (१) सपोउपनि/१७५४ अरविंद्र पवार, (२) पोकॉ/१७५९ प्रविण मोरे, (३) पोकॉ/३०८ अक्षय माहुरे, सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही (१) सपोउपनि/१७५४ अरविंद्र पवार, (२) पोकॉ/१७५९ प्रविण मोरे, (३) पोकॉ/३०८ अक्षय माहुरे, सर्व पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची दिनांक २७/०८/२०२३ रोजीचे २०.०० वा.ते दिनांक २८/०८/२०२३ रोजीचे ०८.०० वा.पर्यत जिल्हा मध्यवर्तीय कारागृह गार्ड डयुटी होती. परंतु श्री अनिल कुरळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर यांची दिनांक २७/०८/२०२३ रोजीचे २३.०० वा.ते दिनांक २८/०८/२०२३ चे ०५.०० वा.पर्यत सर्व आयुक्तालय हद्दीत गस्त असतांना नमुद पोलीस अधिकारी यांनी दिनांक २८/०८/२०२३ चे ००.४० वा. जिल्हा मध्यवर्तीय कारागृह येथील गार्ड चेक केली असता संत्री पहारा डयुटीवर सपोउपनि/१७५४ अरविंद पवार हजर मिळाले, सपोउपनि/१७५४ अरविंद पवार संत्री डयुटीवर असतांना त्यांनी स्वत:हा जवळ कोणतेही अग्नीशस्त्र बाळगले नाही. गार्ड डयुटीवरील ईतर अंमलदार पोकॉ/१७५९ प्रविण मोरे, पोकॉ/३०८ अक्षय माहुरे, हे गार्डरुम मध्ये हजर होते. पोकॉ/१७५९ प्रविण मोरे व पोकॉ/३०८ अक्षय माहुरे हयांचे जवळ SLR रायफल मिळुन आली, परंतु त्यांनी त्यांचे कडील प्रत्येकी ५०-५० राउंड स्वत:जवळ बाळगले नव्हते, गार्ड रुम मध्ये ठेवलेले होते. सपोउपनि/१७५४ अरविंद पवार यांनी रायफल काढली नसल्याचे सांगीतले.परंतु त्यांनी ईतर कोणतेही शस्त्र काढले नव्हते, पोकॉ/१७५९ प्रविण मोरे व पोकॉ/३०८ अक्षय माहुरे यांनी रायफल मॅगझीन मध्ये सुध्दा राऊंड भलेले नव्हते.यावरुन मध्यवर्तीय कारागृह गार्ड डयुटी तुम्ही अलर्ट मिळुन आले नाही.तुम्ही पोलीस विगाभा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे.तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले.तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५०००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे.तरी तुम्हाला दिनांक ३१/०१/२०२४ रोजी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>अंतिम आदेश</u>**

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **<u>"सक्त ताकीद"</u>**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**<u>मयत</u>**

**०१. पोआअ/आस्था-१/मयत पोहवा-गर्गे/१५१६/२०२४अमरावती शहर दिनांक १२/०२/२०२४**

संदर्भ :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे जा.क्र.१८४/२०२४, दि.३१.०१.२०२४ चे पत्र.

**आदेश**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील **पोलीस हवालदार/७०, नंदकिशोर दिनकरराव गर्गे, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर** यांचा आजाराने उपचारादरम्यान त्यांचा दि.१३.०१.२०२४ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यामुळे महानगर पालिका, अमरावती यांनी निर्गमित केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे आधारे त्यांचे नांव या आस्थापनेवरून दि.१४.०१.२०२४ चे माध्यान्हापुर्व पासून कमी करण्यात येत आहे.

**भाग-३**

**<u>वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण</u>**

**<u>संकीर्ण</u>**

**०१. पोआअ/आस्था-१/अवलंबिता सदस्य नोंद/१८३९/२०२४अमरावती शहर दिनांक १५/०२/२०२४**

**<u>आदेश</u>**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अमंलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचेवर पुर्णपणे अवलंबून असलेले कुटूंबातील सदस्यांच्या नावाची नोंद वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ सेवापटात नोंदविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे नांव, पदनाम व ब.क्र. | नेमणूक | कुटूंबातील अवलंबित सदस्याचे नांव व अंमलदाराशी नाते |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/१५२० मनिष विनायकराव करपे | पो.स्टे. राजापेठ | वडील-विनायक करपे, वय-७०<br>आई-पुष्पलता विनायक करपे, वय-६६ |

महिला पोलीस अंमलदारांचे बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१७५/राकावि-२, दिनांक १४.१२.२०२२ व मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८/४९३७/मपोकुआयो/२२/२०२२, दिनांक ०३.०५.२०२३ मधील (अ) ते (ड) अन्वये विवाहीत महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिचे **आई-वडील किंवा सासू-सासरे या दोघांपैकी एकाचीच** वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीचा लाभ घेण्याकरीता निवड करता येते. त्यामुळे **वर नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी निवड केलेल्या वरील अवलंबित सदस्यांच्या नावात त्यांचे सेवाकालावधीत**

**<u>कसलाही बदल</u> करता येणार नाही.** तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांनी विनंती अर्जात नमुद केलेली माहिती खोटी, चुकीची अथवा दिशाभुल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास ते प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

**२.पोआअ/आस्था-१/अपंग अपत्य नोंद/१८४०/२०२४अमरावती शहर दिनांक १५/०२/२०२४**

## <u>आदेश</u>

शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५०/सेवा ४, दि.०८.१०.२०१८ अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या अपत्यास मानसिक विकलांगता/शारिरीक दुर्बलता असेल व असे अपत्य स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असेल तर अशा अपत्यास हयातभर कुटूंबनिवृत्तीवेन मिळण्याची तरतुद मुळ नियमात आहे. त्या अनुषंगाने शासकीय कर्मचारी ज्यावेळी सेवानिवृत्त होईल त्यावेळी त्याच्या मुळ निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये त्याच्या मानसिक विकलांग / शारीरिक दुर्बलता असणाऱ्या अपत्याच्या नावाचा समावेश करण्यात यावा अशी तरतुद आहे.

त्याअनुषंगाने पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे अपत्य मानसिक विकलांग/शारीरिक दुर्बल असल्याने त्याबाबतची नोंद त्यांचे मुळ सेवापटात घेणेबाबत मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र. | नेमणूक | अपत्याचे नांव | अपंगत्वाचा प्रकार व टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | सपोउपनि/१२५६, ज्ञानेश्वर रामदास सदार | पो.स्टे. राजापेठ | अखिलेश ज्ञानेश्वर सदार (जन्म दि.१४.०६.१९९९) | Locomotor Disability (70%) |
| २. | सपोउपनि/प्रयंचा, मुकुंद गणपतराव बोकडे | बिनतारी संदेश विभाग | रेशमा मुकूंद बाकडे (जन्म दि.०७.०४.१९९६) | Mental Retardation (100%) |

तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रामधील नमुद माहिती खोटी, चुकीची अथवा दिशाभुल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास ते प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस